**पाक्षिक**
**वार्षिक वर्गणी रु. २५**
**वर्ष ८ वे, अंक १५ वा**
**किंमत १ रुपया**
**२१ नोव्हेंबर १९९१**

# शेतकरी संघटक

## नव्या लढाईची घोषणा

**— शरद जोशी**

***१० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगाव येथील प्रचंड शेतकरी मेळाव्याचा समारोप करतांना श्री. शरद जोशी यांनी केलेल्या भाषणाचा गोषवारा.***

**माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,**

शेगाव या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी एवढ्या प्रचंड संख्येने एकत्र जमून आपण जे निर्णय घेत आहोत त्यात दोन चमत्कार घडतांना दिसत आहेत. एक म्हणजे संपूर्ण पुराणात शेतकऱ्यांचा राजा म्हणता येईल असा जो एकमेव राजा होऊन गेला, ज्याला विष्णूने वामनअवतार घेऊन जमिनीत गाडला, इडा पिडा टळून ज्याचे राज्य यावे म्हणून वर्षानुवर्षे आयाबहिणी, सारे जग दिवाळीचा उत्सव साजरा करीत असतांना प्रार्थना करीत आल्या आहेत त्या बळीराजाचे पुनरुत्थान.

आणि दुसरा चमत्कार म्हणजे आयुष्यभर जिच्या वाट्याला वनवासच वनवास आला त्या सीतामाईची वनवासातून मुक्तता. सीतेने चौदा वर्षे रामाबरोबर वनवासात राहून हालअपेष्टा सोसल्या. रामाचा वनवास संपल्यानंतर त्याला राज्याभिषेक झाला, पण कुणी तरी काही आक्षेप घेतल्याने रामाने सीतेचा केला. पण त्यावेळी रामाने एवढंसुद्धा म्हटलं नाही की, "बाई, तू चौदा वर्षे माझ्याबरोबर वनवासात राहिलीस, आता एकत्र राहाता येत नसलं तरी तुझ्यासाठी अयोध्येमध्ये एक महाल बांधून देतो." सीतेचा त्याग करतांना इतकं तर

**श्री. शरद जोशी शेगाव येथे जमलेल्या लाख लाख शेतकरी भावा-बहिणींना त्यांनी तेथे येऊन कोणता वसा घेतला आहे ते समजावून देत आहेत.**

सोडाच पण "तू गरोदर आहोस, तुझं बाळंतपण होईपर्यंत राहाण्यासाठी तुला एक झोपडी बांधून देतो" एवढंसुद्धा रामाच्या तोंडून निघालं नाही. तेव्हापासून सीता अजूनही वणवण हिंडते आहे. शेतकरी महिला आघाडी आज सीतेचे मंदिर उभारून खऱ्या अर्थाने तिची वनवासातून मुक्तता करीत आहे.

## राष्ट्रीय कृषिनीतीचा स्वीकार

या मेळाव्यामध्ये आपण पहिला निर्णय घेतो आहोत तो देशाच्या शेतीविषयक धोरणाचा. देशाचं शेतीविषयक धोरण कुणी ठरवायचं? लोकसभेमध्ये बसणाऱ्या पुढाऱ्यांनी, पंतप्रधानांनी का मंत्र्यांनी? शेतीविषयक धोरण खरं तर सरकार आणि शेतकरी दोघांनी मिळून ठरवायला हवे. यासाठी गेली दोनतीन वर्षे आम्ही खूप प्रयत्न केला. पण दरम्यान सरकारच गडबडून गेलं आणि आज परिस्थिती अशी आहे की देशामध्ये सरकार खऱ्या अर्थाने अस्तित्वातच नाही. दहा वर्षांपूर्वी आपण जेव्हा आंदोलन सुरू केलं. तेव्हा शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळणार नाही अशी व्यवस्था करणारं दुष्ट सरकार समोर होतं. आज स्थिती अशी आहे की तसा दुष्टपणा करण्यापुरतंही सरकार अस्तित्वात नाही. आज जे सरकार म्हणून आहे ते म्हणजे दिल्लीच्या खुर्चीवर बसविलेला गुळाचा गणपती आहे. त्यांनी शेतीमालाला भाव द्यायचा म्हटले तरी तो देण्याची त्यांची ताकद नाही. आश्वासने खूप देतील पण त्यांचा खजिना रिकामा आहे. त्यांच्या खिशात रुपया नाही आणि खजिन्यात 'डॉलर'ही नाही. म्हणजे, सरकार नावाची गोष्टच आज देशात शिल्लक नाही.

मग शेतीचं धोरण स्वीकारायचं कोणी? स्वीकारणाऱ्या दोघांपैकी राहाता राहिलो फक्त आपण, शेतकरी. म्हणून या प्रचंड मेळाव्यात आपण देशातल्या सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सांगतो आहोत की देशाचं शेतीविषयक धोरण कसं असावं ते आम्ही सांगतो आहोत. आपण जी 'राष्ट्रीय कृषिनीती' सर्व शेतकऱ्यांच्या वतीने स्वीकारतो आहोत त्याला जे महत्त्व आहे, जी प्रतिष्ठा आहे ती दिल्लीतील गुळाच्या गणपती सरकारच्या लोकसभेने कितीही जाहीरनामे प्रसिद्ध केले तरी त्यांना मिळणार नाही.

## भारत दशक

१९९० साली त्यावेळचे पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंगांनी लाल किल्ल्यावरून 'किसान दशका'ची घोषणा केली. आम्ही विचारतो, "किसान दशक जाहीर करणारे तुम्ही कोण?" उलट, आम्ही इथं जमलेले लाख लाख शेतकरी येती दहा वर्षे 'भारत दशक' म्हणून जाहीर करीत आहोत. पंतप्रधान दररोज रेडिओ व टेलिव्हिजनवर येऊन सांगतात की "देश संकटात आहे, आर्थिक अडचणीत आहे, शेतकऱ्यांनी पुढे यावे आणि देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडवावे." आम्ही आज देशातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना प्रतिसाद देतो आहोत. कारखानदारांचं कोडकौतुक संपलं असेल तर या देशातला शेतकरी देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडविण्यासाठी आपला निर्धार जाहीर करीत आहे. आम्ही देशाला वाचविण्यासाठी येती दहा वर्षे ही 'भारत दशक' म्हणून घोषित करीत आहोत.

## चौफेर शेती

या 'भारत दशका'चा कार्यक्रम काय असेल? आपण शेतकऱ्यांनी काहीही करायचं ठरवलं की पूर्वी मधेमधे येऊन अडथळे आणणारं सरकार होतं तसं आता शिल्लकच उरलं नाही असं समजून आता आपल्याला शेती करावयाची आहे. ही शेती चार प्रकारची असेल. सीता शेती, माजघरातील शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती.

## सीता शेती

सीताशेती म्हणजे सीतेच्या काळात जशी शेती करीत त्याधर्तीवर शेती करणे. आजपर्यंत परकीय चलन खर्च करून जी वरखतं – यूरिया, सल्फेट सारखी आणि औषधं वापरली जात होती ती वापरणे बंद करा. ती वापरून आजपर्यंत आपण खूप पिकवलं. जिथं ५ क्विंटल निघत होतं, तिथं २५ क्विंटल काढलं. पण सोन्याची कौलं काही आपल्या घरांवर चढली नाहीत, 'दिल्ली'ला मात्र ४० मजली इमारती उभ्या राहिल्या. रासायनिक खतांचा बिल्कुल वापर न करता शेतातल्या शेतात तयार होणाऱ्या जैविक पदार्थांचाच वापर करून शेती करणे म्हणजे सीता शेती. माझ्या मायबहिणी सीताशेतीचा आदर्श घालून देण्यात मागे राहाणार नाहीत. आपल्या शेतकरी महिला आघाडीच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत जवळजवळ एक लाख महिलांच्या नावाने शेतजमीन झाली आहे. सीतेला जे भाग्य लाभले नाही ते त्यांना लाभत आहे. आणि येत्या काही वर्षांत महाराष्ट्रातल्या प्रत्येक महिलेच्या नावाने जमिनीचा लहानसा तुकडा का होईना, झालेला असेल अशी काळजी शेतकरी संघटना घेईल. आपल्या नावे जी जमीन झाली आहे त्या जमिनीवर रासायनिक खतांच्या वापराशिवाय शेती करायची सुरुवात मायबहिणी करतील.

## माजघरातील शेती

दुसरा कार्यक्रम, माजघरातील शेती. यातसुद्धा मायबहिणींचा वाटा अधिक असेल. आपल्या शेतात तयार झालेला जो काही माल असेल, मग ती ज्वारी, बाजरी का असेना, तो पोत्यातून बाजारात गेला की त्या पोत्याबरोबर घरातील लक्ष्मीही बाहेर जाते. बाजारात जाण्याआधी, आपल्या शेतात तयार झालेल्या मालाला घरच्या लक्ष्मीचा हात लागला पाहिजे. सगळ्यांनाच त्यापासून पक्का माल तयार करता येईल असे नाही पण माल पोत्यातून पाठविण्याऐवजी तो घरच्याघरी निवडून स्वच्छ करून २ किलोच्या, ५ किलोच्या पिशव्यांत भरून बाजारात पाठविण्याची व्यवस्था केली तरीसुद्धा लक्ष्मी तुमच्या घरी राहणार आहे.

पण त्याहीपलिकडे आपल्या शेतीतील मालावर काही प्रक्रिया करूनच तो माल यापुढे बाजारात पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल. प्रक्रिया करायची म्हणजे काही साखर कारखाने, सूतगिरण्या यांसारखे अवाढव्य कारखाने काढायचे नाही. आजपर्यंत असे कारखाने जेथे जेथे निघाले आहेत तेथे तेथे फक्त चेअरमन गब्बर झाले, डायरेक्टर गब्बर झाले, शेतकऱ्याच्या दारापर्यंत काहीच पोहोचले नाही. आपल्याला प्रक्रिया करायची ती माझ्या मायबहिणींची माजघरातील प्रक्रिया शेती असेल, चेअरमन बनवायची प्रक्रिया नव्हे.

## व्यापारी शेती

पुढचा कार्यक्रम व्यापारी शेतीचा. इथं मात्र आपल्याला सगळ्यांना भाग घ्यावा लागेल. शेतकऱ्याच्या घरात प्रक्रिया करून जो जो माल तयार होईल तो खपविण्याची जबाबदारी आपल्यावर येणार आहे. अगदी नजिकच्या काळामध्ये, शेतकऱ्यांनी तयार केलेला ताजा व उत्तम प्रतीचा माल ग्राहकांना इतर कुठल्याही ठिकाणांपेक्षा रास्त व कमी किंमतीत मिळू शकेल अशा ५००० दुकानांची साखळी आपण महाराष्ट्रभर उभी करणार आहोत.

## निर्यात शेती

चौथा कार्यक्रम निर्यात शेती. आपण देशाला परकीय चलनाच्या संकटातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निर्यात ओघानेच आली. मग आधीचे तीन कार्यक्रम कशासाठी? आपला मूळ पाया पक्का असल्याखेरीज आपण निर्यात करायला गेलो तर टिकाव धरू शकणार नाही. आपण आता छोटे शेतकरी राहाणार नाही, तर आपण आता आंतरराष्ट्रीय शेतकरी बनत आहोत. काही योजना तयार आहेत. माझा असा विश्वास आहे की येत्या दहा वर्षात आपण आपल्या एकूण उत्पादित मालापैकी १० टक्के मालाची निर्यात करू शकू आणि देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडवू शकू.

## शासनाला इशारा

शेतकरी आता जागा झाला आहे. त्याने स्वीकारलेल्या – 'राष्ट्रीय कृषिनीती'ला अनुसरून सीता शेती, माजघरातील शेती, व्यापारी शेती आणि निर्यात या चार प्रकारांनी आपला व्यवसाय चालविणार आहे. दिल्लीच्या खुर्चीवर बसलेले सरकार गुळाचा गणपती असला तरी शेतकऱ्यांच्या या प्रयत्नात अडथळे आणण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. कापूस, ऊस, दूध यांच्या बाबत हे सरकार जे निर्णय घेते आहे त्यावरून ही शक्यता अगदीच नाकारण्यासारखी नाही. त्यामुळे त्याबाबतीतही आपण सावध असले पाहिजे. आता आम्ही सरकारवर अवलंबून न राहाता स्वतंत्र शेती, चौफेर शेती करायला लागलो आहोत. त्यातही जर सरकारने अडथळे आणण्याची वळवळ केली तर आपली आंदोलनाची ताकद त्यांना दाखवून देऊन किसान समन्वय समितीच्या बैठकीतसुद्धा असा निर्णय झाला आहे की सरकारने जर का शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांत अडथळे आणले तर देशव्यापी आंदोलन उभे केले जाईल.

आज आपण आपल्या पायावर उभे राहून आपले आणि आपल्या देशाचे भवितव्य घडविण्याचा निर्णय घेत आहोत. सरकारचं अस्तित्व संपलं आहे. त्यांच्या हातातली शस्त्रं निकामी झाली आहे. आर्थिक संकट आलं आहे ते संपूर्ण देशावर नाही तर इंडियावर. इंडियावर आलेलं हे आर्थिक संकट म्हणजे वर्षानुवर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या भारताच्या दृष्टीने सुवर्णसंधी आहे. आणि म्हणून ही नवीन प्रकारची लढाई सुरू होत आहे.

---

# शेगाव मेळाव्याचे मानकरी

**– गोपाळ परांजपे, पुणे**

"अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती" असे शब्द असलेले एक गीत बरेच लोकप्रिय आहे. थोडी तशीच काही प्रतिक्रिया शेतकरी संघटनेचा शेगावचा मेळावा पाहिल्यावर माझी झाली. या मेळाव्याचे मानकरी कोण म्हणता येतील? मा. शरद जोशी? मा. भूपिंदरसिंग मान इत्यादि इतर राज्यांतले शेतकरी नेते? आजी माजी अध्यक्ष? या मेळाव्यासाठी झटून काम केलेले कार्यकर्ते?

या सर्वांचे स्थान तर अनन्यसाधारण आहेच. पण मला असे वाटते की सर्वोच्च मानाचा हक्क पोहोचतो तो मेळाव्याच्या दिवशी सकाळपासूनच मैदारात जागा धरून बसलेल्या उन्हातान्हाची, पावसाची तमा न बाळगणाऱ्या, आणि व्यासपीठावरून येणारा प्रत्येक शब्द जीवाचे कान करून ऐकणाऱ्या शेतकरी भावांना, आणि मायबहिर्णींना. असे किती होते? पोलीस खात्याने केलेल्या अंदाजाप्रमाणे पावणे दोन लाख, वृत्तपत्रांनी लिहिल्याप्रमाणे दीड ते तीन लाख, निश्चित आकडा कोणीच सांगू शकणार नाही. अगणित लोक होते येवढेच म्हणण्याचे धारिष्ट मीसुद्धा करतो. पण माझ्या दृष्टीने अशा संदर्भात आकड्यांना फारसे महत्त्व नाही. महत्त्व आहे ते अशा शेतकरी भावांच्या आणि मायबहिर्णींच्या भावनेचे, संघटने- बद्दलच्या त्यांच्या निष्ठेचे.

हे अगणित शेतकरी स्त्रीपुरुष ट्रकमधून आले. टेंपोमधून आले. मालगाड्यांमधून टपावर बसून आले. बरोबर एकदोन दिवसांची शिदोरी, पण पुरेसे अंथरुण पांघरुणसुद्धा नाही! मेळाव्याच्या आदल्या रात्रीपासून ते मेळाव्याच्या घटकेपर्यंत "शरद जोशी आगे बढो हम तुम्हारे साथ हैं", "शेतकरी संघटनेचा विजय असो" वगैरे घोषणा देत स्त्री पुरुषांचे लोंढेच्या लोंढे हुतात्मा नगराकडे येत होते.

सुमारे ५ वाजता मेळावा संपला आणि अक्षरशः पुढच्या अर्ध्या तासांत मैदान रिकामे झाले, कसलाही गोंधळ, गडबड, गैरशिस्त न होता. रात्रभर उघड्यावर मुक्काम करून मंडळी परतीला पुन्हा मार्गस्थ झाली.

असंख्य शेतकरी स्त्रीपुरुष आले आणि माझ्या मनांत त्यांची स्मृती ठेवून परत गेले. पण यांना पाखरे म्हणायचे का? तसे पाहिले तर म्हणायला हरकत नाही. नाहीतरी या जगांत येणारा प्रत्येक जीव जगाच्या पटलावर काही काळ घालवणारा पक्षीच असतो. शेक्सपीअर त्यांना जगाच्या रंगपटावरचे नट म्हणतो. या पक्ष्यांत काही मोर असतात, काही बगळे, तर काही गिधाडे!

या मेळाव्याला आलेले शेतकरी स्त्रीपुरुष श्रद्धेने आणि निष्ठेने आले आणि परत गेले. संघटनेने स्वीकारलेल्या कृषीनीतीचे विश्लेषण त्या सर्वांना समजले असेलच असे नाही. पण त्यांची श्रध्दा आणि निष्ठा हे संघटनेचे खरे भांडवल आहे. या कृषीनीतीचे धागेदोरे नीट उलगडून दाखवून त्याबरहुकूम कृती करण्यास या सर्वांना उद्युक्त करणे हे एक फार मोठे आव्हान संघटनेच्या कार्यकर्त्यांसमोर आता उभे आहे. ते सर्वांनी आपापल्या जबाबदारीनुसार समर्थपणे पेलले पाहिजे. नाहीतर मेळाव्याची फक्त स्मृतीच शिल्लक राहील.

# शेगांव जाहीरनामा

## (१० नोव्हेंबर १९९१)

**आम्ही,**

आज दिनांक १० नोव्हेंबर १९९१ रोजी, शेगाव येथे एकत्रित झालेले विविध जाती-जमातींचे, प्रदेशांचे आणि धर्मांचे, 'इंडिया' नव्हे तर 'भारता'तील विशाल शेतकरी समाजाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधीत्व करणारे **शेतकरी स्त्रिया आणि पुरुष;**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, असंतुलित शहरीकरण, वाढत्या झोपडपट्ट्या, आर्थिक व तंत्रज्ञानविषयक परावलंबन, परकीय व देशांतर्गत कर्जसापळे, काळा पैसा, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, संकुचितता आणि फुटीरतावाद इत्यादिंना कारणीभूत असलेल्या नववसाहतवादी व शासनाधारित अर्थव्यवस्थेच्या पतनाचे स्वागत करून;

झपाट्याने खालावत चाललेली जातीय परिस्थिती, अतिरेकी हिंसक समाजकंटकांची वाढती गुर्मी, परिस्थिती काबूत आणण्याबाबत शासनाची असमर्थता, सविनय कायदेभंग व सत्याग्रह यांसारख्या शांततामय व वैधानिक मार्गांनी आपल्या मनातील असमाधानाला वाचा फोडण्यास असमर्थ ठरल्यामुळे सामान्य नागरिकाला ग्रासणारे वाढते नैराश्य यांची गांभीर्याने दखल घेतो; आणि

तरीही, विविध मार्गांनी लाखो वर्षे शेतकऱ्यांच्या झालेल्या शोषण आणि पिळवणुकीनंतर, आशेची नवी पहाट पाहात आहोत.

**बळिराजाच्या पुनरुत्थानासाठी आणि**

**शेगाव येथे जमलेले शेतकरी भाऊ**

**आम्ही,**

निदान आज तरी शासन आपल्या पक्षपाती व्यापार व विनिमय धोरणांनी शेतकरीविरोधी किंमत धोरणे राबविण्याचे धारिष्ट्य करू शकणार नाही हे लक्षात घेऊन;

त्याही पलिकडे, आजपर्यंतची सर्व रंगीढंगी सरकारे, शेतीक्षेत्रासंबंधी त्यांनी केलेली विधाने ही धादांत खोटी तरी ठरली असती किंवा राजकीयदृष्ट्या गैरसोयीची ठरली असती या साहजिक कारणाने राष्ट्रीय कृषिनीती निर्धारित करण्यास असमर्थ ठरली आहेत याची नोंद घेऊन;

कर्जपरतफेडीची समस्या अत्यंत नाजूक बनलेली असतांना सुद्धा, ज्या औद्योगिक क्षेत्राची निर्यातक्षमता अगदी नगण्य आहे त्या क्षेत्रासाठी जवळजवळ केवळ एका रात्रीत नवीन औद्योगिक नीती पक्की होऊ शकते पण कृषिनीतीचा मात्र विचारसुद्धा होत नाही या वस्तुस्थितीच्या संदर्भाने;

आणि, आता क्रियाशील आर्थिक ताकदीच्या दृष्टीने उघड्याबोडक्या झालेल्या शासनाने राष्ट्रीय कृषिनीतीचा स्वीकार करणे किंवा न करणे याला काही खास महत्त्व उरलेलेच नाही याची खात्री पटून;

स्थायी कृषि सल्लागार समितीने राष्ट्रीय कृषिनीतीच्या संदर्भात दिलेला अहवाल देशातील समग्र शेतकरी समाजाच्या वतीने, स्वीकारण्याचा निर्णय घेतो.

**आम्ही** निश्चय करतो की,

सन २००१ पर्यंतचे दशक हे 'भारत दशक' म्हणून पाळले जाईल आणि आजवरच्या चुकीच्या धोरणांमुळे देशासमोर उभ्या ठाकलेल्या आर्थिक, सांपत्तिक व कर्जफेडीविषयक समस्यांतून देशाला सोडविण्यासाठी आणि तसे करतांना विकासाच्या प्रक्रियेत शेतीक्षेत्र व शेतकरी यांना अग्रस्थान देणारा पुढील कार्यक्रम आखला जाईल :

## स्वयंसिद्धा सीतेच्या वनवाससमाप्तीसाठी

### आणि मायबहिणी

* विविधांगी मूल्यवर्धक शेतीव्यवसायाची वाटचाल सुरू करणे, ज्या योगे, सन २००१ पर्यंत कोणताही शेतीमाल कच्च्या स्वरूपात आणि घाउक प्रमाणात, काही ना काही क्रिया-प्रक्रिया झाल्याशिवाय बाजारात जाणार नाही.
* उत्पादकांना किफायतशीर भाव देणारी बाजारपेठ उपलब्ध व्हावी आणि ग्राहकांना रास्त दरात त्या उत्पादनांचा पुरवठा व्हावा यासाठी देशभर किरकोळ विक्री केंद्राचे जाळे तयार करण्यात येईल.
* देशातील बहुसंख्य शेतीउत्पादनांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांतील वरचढपणाचा फायदा घेऊन कृषिउत्पादने व कृषिआधारित प्रक्रिया उत्पादनांच्या निर्यातीला पुढाकार देणे, जेणेकरून सन २००१ च्या सुमारास एकूण उत्पादनाच्या १० टक्के शेतीमाल निर्यात केला जाईल.
* रसायनांच्या अतिरेकी आणि असंतुलित वापरामुळे तसेच जमिनीच्या अतिवापरामुळे होणारी हानी थांबविण्यासाठी आणि ती भरून काढण्याच्या हेतूने शेतीव्यवसायात रास्त तंत्रज्ञान व पद्धती वापरण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक, त्वरेने आणि मोठ्या प्रमाणावर पावले उचलणे.
* शक्य तितके, शेतीला बाह्यसामुग्रीच्या वापरातून मुक्त करणे आणि शेती हा एक आर्थिक, स्पर्धात्मक व मूल्याधिष्ठित (हिशोबी) व्यवसाय बनविणे.

या कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी
**आम्ही**

– सर्व संबंधितांना ताकदी देतो की, धोरणांच्या किंवा कार्यवाहीच्या पातळीवर शेतीमालाची निर्यात, वाहतूक, व्यापार, प्रक्रिया यावर बंधने लादण्याचा प्रयत्न झाला तर ते राष्ट्राला समस्यामुक्त करण्याच्या कार्याला विरोध केल्यासारखे ठरेल व म्हणून, त्याचा निकराने विरोध केला जाईल;
– इशारा देतो की, नवीन उद्योगनीतीने ज्या सोयीसवलती देऊ केल्या आहेत त्या शेतीमाल प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना नाकारणे हे राष्ट्रविरोधी कृत्य समजले जाईल आणि त्याचा सर्व शक्तीनिशी विरोध केला जाईल, आणि
– निर्णय घेतो की, स्वावलंबी व वर्धित-मूल्य शेतीव्यवसायाच्या कार्यप्रणाली अशा असतील की त्यामध्ये ग्रामीण भागातील महिलांना महत्त्वाची भूमिका निभावण्याची संधी उपलब्ध व्हावी.

**आम्ही,**
असाही ठराव करतो की,
देशातील इतर नागरिकांप्रमाणे माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळविण्याची ही संधी आम्ही पुरेपूर वापरणार आहोत, आणि

जाहीर करतो की,
आमचे जे पुढील हक्क आहेत त्यांच्या प्राप्तीसाठी आणि रक्षणासाठी आम्ही आमच्या प्रयत्नात जराही कसूर करणार नाही.

* केवळ उपजीविकेचे साधन म्हणून नव्हे तर सर्वंकष आर्थिक व्यवसाय म्हणून शेतीची प्रतिष्ठापना करणे,
* इतर क्षेत्रांतील आमच्या तोडीच्या बांधवांप्रमाणेच आमचे प्रयत्न, गुंतवणूक आणि आम्ही पत्करलेले धोके यांच्या प्रमाणात जीवनमान प्राप्त करणे,
* सामाजिक व आर्थिक संरचना आणि संपत्ती-मालमत्ता-धारणेसंबंधी समान सोयीसवलती, संधी आणि हक्कांचा लाभ घेणे,
* कोणताही किंवा सर्वच शेतीमाल साठविणे, टिकविणे, त्याची वाहतूक करणे, त्यावर प्रक्रिया करणे किंवा तो काढून टाकणे याचे, आमच्या व्यवसायाचा एक भाग म्हणून स्वतंत्र्य असणे,
* शेतीव्यवसाय व त्यासंबंधी इतर कामकाज चालविण्यासाठी व्यावसायिक संघटना/संस्थांचे योग्य असे पर्याय वापरण्याची समान शक्यता असणे,
* देशाची निसर्गदत्त संपत्ती, जीवनाधार व्यवस्था आणि आमच्या व्यवसायाचा फायदेशीरपणा यांच्यावर विपरित परिणाम करणाऱ्या शासकीय धोरणांपासून संरक्षण करणे,
* जगातील बाजारपेठा आणि शेतीउपयोगी सामुग्रीचे स्त्रोत तसेच विज्ञान व तंत्रज्ञान यांचा वापर करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असणे,
* आमच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी असांप्रदायिक व अहिंसक अशा, कोणत्याही घटनात्मक स्वरूपात संघटित होणे.

●●●

**शेगावच्या शेतकरी मेळाव्यात**

## ★ राष्ट्रीय कृषिनीतीचा जाहीर स्वीकार
## ★'भारत दशका' ची घोषणा
## ★ देशाला कर्जफेडीच्या समस्येतून बाहेर काढण्याचा निर्धार
## ★ 'स्वयंसिद्धा सीता' मंदिराचा संकल्प

# शेगाव मेळाव्याचा वृत्तांत

**शेगाव येथे १० नोव्हेंबर १९९१ रोजी शेतकरी संघटनेच्या मेळाव्यास प्रचंड संख्येने जमलेल्या शेतकरी स्त्रीपुरुषांनी शासनाच्या पुढाकाराची वाट न पाहाता 'राष्ट्रीय कृषिनीती' चा स्वीकार केला व देशाला सध्याच्या कर्जफेडीच्या समस्येतून व आर्थिक समस्येतून सोडविण्यासाठी सन १९९१ ते २००० हा काळ 'भारत दशक' म्हणून पाळण्याचा निर्धार केला.**

माजी पंतप्रधान श्री. विश्वनाथप्रताप सिंग यांनी मार्च १९९० मध्ये राष्ट्रीय कृषिनीती तयार करण्याची कल्पना मांडली होती व त्याचा मसुदा तयार करण्याचे काम श्री. शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी कृषिसल्लागार समितीवर सोपविले होते. जनता दल शासनाची सत्ता संपता संपता अनेक मतभेदांच्या कारणांनी 'राष्ट्रीय कृषिनीती' वादाच्या भोवऱ्यात अडकली. तरीही, दरम्यान, १९९० मध्ये लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाचे भाषण करतांना श्री. व्ही. पी. सिंग यांनी सन १९९१ ते २००० हा काळ 'किसान दशक' म्हणून घोषित केला होता. त्यानंतर आलेल्या चंद्रशेखर शासनाने आपल्या अल्प कालावधीच्या अखेरी अखेरी राष्ट्रीय कृषिनीतीचा एक जुजबी मसुदा तयार करवून घेऊन तो चर्चा आणि प्रतिक्रियांसाठी घाईघाईने वितरीत केला. या प्रकाराला स्थायी कृषिसल्लागार समितीने आपली नापसंती दर्शविली आणि या जुजबी प्रक्रियेपासून ती बाजूला झाली.

शेगावच्या या मेळाव्यात शेतकऱ्यांनी एक पाऊल पुढे टाकून स्थायी कृषिसल्लागार समितीने या विषयावर दिलेल्या अहवाला-बरहुकूम 'राष्ट्रीय कृषिनीती' चा स्वीकार केला. राष्ट्रीय कृषिनीतीच्या स्वीकारास जबाबदार असणारा दुसरा घटक म्हणजे सरकार. पण, आज अस्तित्वात असलेले सरकार कोणत्याही बाबतीत प्रभाव पाडू शकेल अशा आर्थिक कर्तृत्वाचे नसल्याने राष्ट्रीय कृषिनीतीच्या स्वीकारात या सरकारचा सहभाग शेतकऱ्यांना अनावश्यक वाटतो.

भूतकाळातील चुकांचे परिमार्जन करण्याच्या भावनेने मांडली गेलेली 'दशका' ची कल्पना शेतकऱ्यांनी कायम ठेवली आहे पण देशाला कर्जफेडीच्या समस्येतून व आर्थिक कोंडीतून बाहेर काढण्यासाठी सन १९९१ ते २००० हा काळ 'भारत दशक' म्हणून पाळण्याचे ठरविले आहे.

शेतीला 'हरित क्रांतींच्या' बेडीतून मुक्त करून आणि विशेषतः, विकेंद्रीत प्रक्रिया, किरकोळ विक्रीकेंद्रांद्वारे देशांतर्गत व्यापार आणि निर्यात यांच्या साहाय्याने स्वतःच्या पायावर चालणारा व्यवसाय बनविणे हा या 'दशका' चा तातडीचा प्राथमिक कार्यक्रम राहील.

देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शेतकरी सुरू करीत असलेल्या प्रयत्नांत शासनाने शेतीमालाचा व्यापार, प्रक्रिया व निर्यात यांवर बंधने लादून अडथळे आणले तर त्याचा तीव्र विरोध केला जाईल असा इशारा शासनाला या मेळाव्यात देण्यात आला.

या मेळाव्यात घोषित करण्यात आलेल्या जाहीरनाम्याने जैविक शेतीच्या विकासात आणि घरच्या घरी चालवावयाच्या प्रक्रिया व्यवसायात स्त्रियांना विशेष महत्त्वाची भूमिका दिली आहे.

शेगावच्या या शेतकरी मेळाव्यात शेतकरी महिला आघाडीने 'स्वयंसिद्धा सीते' चे मंदिर उभारण्याची चित्तवेधक घोषणा केली. सीतेने आपल्या निराश्रित आयुष्यातील अखेरचा काळ ज्या गावात काढला आणि तेथेच जुळ्याला जन्म दिला अशी अख्यायिका असलेल्या रावेरी (जि. यवतमाळ) या गावी हे संकल्पित मंदिर बांधण्यात येणार आहे. बाळंतपणानंतर मूठभर गव्हासाठी सीतेवर गावात भीक मागण्याची पाळी आली, पण गावाने तिला भीकही घातली नाही त्यामुळे या गावाच्या शिवारात गहू कधीच पिकणारा नाही असा शाप गावाला मिळाला अशी एक दंतकथा आहे. अशा या गावी बांधण्यात येणाऱ्या 'स्वयंसिद्धा सीते' च्या मंदिराच्या बांधकामाचा खर्च कमावत्या स्त्रियांकडून जमविलेल्या वर्गणीतून करण्यात येणार आहे. या मंदिराच्या उभारणीच्या निमित्ताने युगायुगाने चालत आलेली स्त्रियांची हालाखी प्रकाशात यावी अशी अपेक्षा आहे.

या मेळाव्याला तीन लाखांहून अधिक

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st November, 1991

To

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 21, 1991

शेतकरी हजर होते. ८ तारखेच्या संध्याकाळपासूनच शेतकरी स्त्रीपुरुष आपल्या मुलाबाळांसह शेगावात येऊ लागले. ९ तारखेला शेगाव संपूर्ण शेतकरीमय झाले, शेतकरी संघटनेच्या घोषणांनी दुमदुमून गेले. शेतकरी संघटनेचे बुलढाणा व अकोला जिल्ह्यांतील कार्यकर्ते तसेच प्रशासन आपल्या परीने निवास, पाणी इत्यादीची व्यवस्था करण्याचे प्रयत्न करीत होते. पण येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याच इतकी प्रचंड होती की कितीही व्यवस्था केली तरी अपुरीच पडत होती. पण त्याची खंत बळीराजाच्या पुनरूत्थानासाठी जमलेल्या शेतकऱ्यांना आणि 'स्वयंसिद्धा सीते' च्या पुनरूत्थानासाठी आलेल्या शेतकरीणींना अजिबात नव्हती. त्यांनी मेळाव्याच्या मैदानावर व मैदानाच्या आजुबाजूच्या झाडांच्या आसऱ्याने आपली आपली व्यवस्था लावून घेतली होती.

मेळाव्याच्या आदल्या दिवशी देशाच्या सर्व राज्यांतील शेतकऱ्यांच्या संघटनांच्या 'किसान समन्वय समिती'चा प्रदीर्घ बैठक होऊन त्यात देशातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर 'शेगावचा जाहीरनामा' निश्चित करण्यात आला.

मेळाव्याच्या दिवशी सकाळी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक झाली.

मेळाव्यामध्ये 'राष्ट्रीय कृषिनीती'च्या स्वीकाराचा प्रस्ताव गुजरातमधील खेडूत समाजाचे श्री. बिपिनभाई देसाई यांनी मांडला. या प्रस्तावाला आंध्र प्रदेशातील रैथु संघम् चे श्री. व्ही. एम् पटने, हरियानातील भारतीय किसान यूनियनचे अध्यक्ष श्री. घांसीराम नैन आणि उत्तर प्रदेशातील भारतीय किसान यूनियन (अ) चे अध्यक्ष ॲड. हरपाल सिंह यांनी अनुमोदन दिले.

'भारत दशका'चा कार्यक्रम पंजाबच्या भारती किसान यूनियनचे अध्यक्ष खासदार भूपेंद्रसिंग मान यांनी मांडला. शेतकरी संघटनेचे नूतन अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांनी सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा फायदा नोकरशहा आणि राजकीय पुढाऱ्यांना उठवता येऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कार्यक्रमाची मांडणी केली. त्या कार्यक्रमाप्रमाणे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते रोजगार हमी योजनेतील कामांसारख्या मदतकार्यावर सजगपणे देखरेख ठेवून मजुरांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेतील. महाराष्ट्र शासनाने कापूस व ऊस यांच्या भावासंबंधी घेतलेल्या अन्याय्य निर्णयांबाबत किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया यांनी महाराष्ट्र शासनाला गंभीर इशारा दिला. त्यांनी आपल्या भाषणात भातावरील लेव्ही तसेच दुधाची पावडर व लोणी यांची संकल्पित आयात रद्द करण्याचीही मागणी केली. या बाबतीत १ डिसेंबरपर्यंत शासनाने समाधानकारक हालचाल केली नाही शेतकऱ्यांचे उग्र आंदोलन उभे राहील असा इशाराही त्यांनी दिला. शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल यांनी "स्वयंसिद्धा सीते"च्या मंदिराच्या उभारणीचा प्रस्ताव मांडला.

मेळाव्याच्या मंचसंचालनाचे काम माजी अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे यांनी केले. सुरुवातीला सर्व उपस्थित शेतकरी स्त्री-पुरुषांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शेतीमालाच्या रास्त भावाच्या लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या शेतकरी भावांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर 'राष्ट्रीय कृषिनीती'च्या मराठी भाषांतराचे जाहीर प्रकाशन श्री. शरद जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्याच्या शेवटी सर्वांनी शेतकरी संघटनेच्या प्रतिज्ञेचा सामूहिकपणे उच्चार करून शेतकऱ्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे या करिता सतत प्रयत्नशील राहाण्याचा निर्धार व्यक्त केला.

मेळाव्याच्या समारोपाचे भाषण श्री. शरद जोशी यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी या मेळाव्यात घोषित झालेला कार्यक्रम शेतकरी आंदोलनाच्या 'रास्त भावा'चाच कार्यक्रम असल्याचे खुलासेवार विश्लेषण केले. आर्थिक संकट उभे राहिले ते 'इंडिया'समोर; या संकटातून देशाला वाचविणे आणि देशाची अर्थव्यवस्था दुरूस्त करण्याची संधी 'भारता'ला मिळाली आहे आणि त्या संधीचा पुरेपूर वापर शेतकरी करतील असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले.

शेतकरी प्रकाशन ॥१९॥
श्री. शरद जोशीकृत
**राष्ट्रीय कृषिनीती**
(मराठी अनुवाद)
मूल्य रु. दहा मात्र
मिळण्याचे ठिकाण :
शेतकरी संघटना, मध्यवर्ती कार्यालय,
आंबेठाण (४१० ५०१) ता. खेड, जि. पुणे.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.